# जनसंपर्क विभाग

जळगाव दि. ३० (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विविध पदवी परीक्षांना उद्या दि. १ डिसेंबर पासून प्रारंभ होत आहे. दरम्यान कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांनी विद्यार्थ्यांना पत्र पाठवून परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.टेक. (कॉस्मेटिक सीएस), बी.फार्म., डी.पी.ए., बी.एम.एस. आदी सत्र परीक्षा २०२२ साठी ४६ हजार पेक्षा अधिक विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. यावर्षी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रश्नपत्रिका या परीक्षाकेंद्रावर ऑनलाईन पध्दतीने पाठविल्या जाणार आहेत. परीक्षा झाल्यानंतर उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन ऑनस्क्रीन होणार असून प्रथम वर्षाच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन महाविद्यालयांमध्ये होणार आहे. पर्यावरणाचा सामान्य ज्ञानाची परीक्षा ऑनलाईन होणार आहे. कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षेची तयारी पूर्ण झाली असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा. दीपक दलाल यांनी दिली.

दरम्यान कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांनी परीक्षार्थी विद्यार्थ्यांना पत्र लिहिले असून या परीक्षा ताणतणाव न घेता शांत व आत्मविश्वासाने देण्याचे आवाहन या पत्राद्वारे त्यांनी केले आहे. परीक्षा म्हणजे जीवनाती अंतिम टप्पा नसून यशस्वी होण्याच्या मार्गावरील एक पायरी आहे. त्यामुळे अपेक्षांचे ओझे डोक्यावर ठेवू नका. स्वत:वर विश्वास ठेवावा. परीक्षा केंद्रावर शिक्षक आणि कर्मचाऱ्यांशी सहकार्याचे वर्तन ठेवा. परीक्षेच्या काळात मानसिक स्वास्थ्य चांगले राहील याकडे लक्ष देवून रात्रभर न जागता चांगला आहार, संतुलित व्यायाम आणि पुरेशी झोप याकडे लक्ष द्या. नकारात्मक विचार मनात न आणता परीक्षेला सामोरे जा. यश मिळेल असा सल्ला देत कुलगुरूंनी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

**बातमी नं. २**

जळगाव दि. ३० (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पर्यावरण आणि भूशास्त्र प्रशाळेतील उपयोजित भूविज्ञान विभाग प्रमुख प्रा. एस.एन. पाटील यांची असोसिएशन ऑफ ग्लोबल ग्राऊंड वॉटर सायंटिस्ट कार्यकारी परिषद सदस्य म्हणून निवड झाली आहे.

असोसिएशन ऑफ ग्लोबल ग्राऊंड वॉटर सायंटिस्टची स्थापना २०१३ मध्ये झाली असून भूजल, भूविज्ञान, अभियांत्रिकी भूविज्ञान, भूजल संशोधक आणि भूतंत्रज्ञान अभियांत्रिकी या क्षेत्रातील जगभरातील तज्ञांचा यामध्ये समावेश आहे. ही असोसिएशन भूगर्भ शास्त्रज्ञ आणि भूजल अभियंते यांच्यातील मजबूत पुल म्हणून प्रभावीपणे काम करीत आहे. प्रा. एस.एन. पाटील यांच्या संशोधनाची आणि कामाची दखल घेवून कार्यकारी परिषद सदस्य म्हणून त्यांची निवड करण्यात आली आहे. गेल्या ३२ वर्षापासून भूशास्त्र विषयामध्ये डॉ. पाटील हे अध्यापन आणि संशोधनाचे काम करीत आहे. विद्यापीठाचा २०१६ चा उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार त्यांना प्राप्त झालेला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ९ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पूर्ण केली आहे. ९७ शोधनिबंध प्रसिध्द झालेले असून ७ संशोधन प्रकल्प त्यांनी पूर्ण केलेले आहेत. त्यांच्या या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

...२

# जनसंपर्क विभाग



## बातमी नं. ३

जळगाव दि. ३० (प्रतिनिधी) आयुष्यात दु:खाला कवटाळून राहणे योग्य नसून स्वत: विषयी कमीतकमी विचार करून मन सदृढ ठेवले तर सुखी व्हाल असे प्रतिपादन साहित्यिक डॉ. हेमंत खडके यांनी ऑनलाईन व्याख्यानमालेत बोलतांना केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने खान्देश कन्या कवयित्री बहिणाबाई चौधरी ऑनलाईन व्याख्यानमालेत डॉ. खडके हे 'सुखी माणसाचा सदरा' या विषयावर बोलत होते. कुलसचिव डॉ. विनोद पाटील अध्यक्षस्थानी होते. डॉ. खडके म्हणाले दैनंदिन जीवन जगत असतांना दृष्टीकोन बदलला की जीवन जगण्याचा अर्थ बदलतो. माणसाच्या दु:खाचे कारण तो स्वत: आहे. सुखापेक्षा दु:खाला वरचे स्थान देवू नका. आयुष्यात कुढत राहू नका. मन सदृढ ठेवले तर सुखी रहाल असा सल्ला त्यांनी दिला. डॉ. विनोद पाटील आपल्या भाषणात म्हणाले की, जीवनात यशस्वी होण्यासाठी शारिरीक व मानसिक सदृढता गरजेची आहे. यश मिळाले तरी पाय जमिनीवर राहणे गरजेचे आहे. यावेळी विभागाचे संचालक प्रा. आशुतोष पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रवीण देशमुख यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सूत्रसंचालन योगेश महाजन यांनी केले. तर वैशाली पाटील हिने आभार मानले.

## बातमी नं. ४

जळगाव दि. ३० (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाच्या वतीने विद्यापीठात करीअर मार्ग या विषयावर घेण्यात आलेल्या कार्यशाळेला उत्तम प्रतिसाद मिळाला.

या कार्यशाळेत २५६ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. या कार्यशाळेत नोकरीचा शोध, कौशल्य प्रशिक्षण, पोर्टल याबाबत माहिती देण्यात आली. नॅशनल करीअर सर्व्हिस हा प्रकल्प रोजगार महा संचालनालय आणि रोजगार मंत्रालयामार्फत राबविण्यात येतो. याबाबतही माहिती देण्यात आली. डॉ. अनिल जाधव यांनी या कार्यशाळेत मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी कक्षाचे समन्वयक प्रा. रमेश सरदार होते. प्लेसमेंट ऑफिसर सोनली दायमा यांनी प्रास्ताविक केले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: ३० नोव्हेंबर, २०२२

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी